**आर.सी.सी .क्र.९५/२०१६**
**सरकार वि. सुनिल काटे**
**नि.क्र.५८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांचा पुरावा**.

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – बाबासाहेब बापु झुबंड,
वय – ४९ वर्षे , व्यवसाय – शेती,
राहणार – खानापुर, ता. शेवगाव, जि.अहमदनगर

सरतपासणी सहा. सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**–

०१. दि.१४.०९.२०१६ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशनला पंचनाम्याकामी बोलावले नव्हते. त्यादिवशी माझ्या समक्ष काहीही जपत केले नाही अथवा जप्ती पंचनामा तयार केला नाही. आता साक्षीदारास जप्ती पंचनमा दाखवण्यात आला. माझी पंचनाम्यावर फक्त सही आहे. परंतु पंचनाम्यातील मजकुराविषयी मला काही एक माहिती नाही.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्यसाची परवानगी मागितली. परवानगी मंजूर करण्यात आली).*

०२. माझे पाचवी पर्यंतचे शिक्षण झालेले आहे. मला थोडे फार वाचता येते. मी इतर कागदपत्रावर वाचुन सही करतो. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनाम्यावर वाचुन सही केली.

०३. हे म्हणणे खरे नाही की, दि.१४.०९.२०१६ रोजी पोलीसांनी मला शेवगाव पोलीस स्टेशनमध्ये जप्ती पंचनाम्याकरीता बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी पोलीस स्टेशन शेवगाव येथे गेलो असता त्याठिकाणी फिर्यादी विष्णुदास विठ्ठलदास लाहोटी हे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विष्णुदास

लाहोटी यांनी त्यांच्या दुकानात झालेल्या चोरीबाबतचे सी.सी.टी.व्ही. कॅमे–यातील फोटेजच्या दोन सीडी आणुन दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्या दोन सीडी माझ्या समक्ष विष्णुदास लाहोटी यांच्याकडुन जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या सांगण्यावरुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.के.एम.अंधारे यांनी उलटतपास नाकारला**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृति

KULKARNI DATTATRAYA RAMESH
Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2025.09.17 18:00:46 +0530

दिनांक- १६.०९.२०२५

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,
कोर्ट नं. ३ शेवगाव